वाचले:- १) मे.सक्सेस इन्फ्रा तर्फे श्री विशाल देविचंद अगरवाल व श्री सुरेश जयंतीलाल पटेल रा. रावेत प्राधिकरण ता हवेली पुणे यांचा दि.२०/४/२०२१ चा अर्ज.
२) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचेकडील लिज डीड दस्त दि. १८/१२/२०२०
३) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांचेकडील अलाऊटमेंट प्रमाणपत्र दि.३०/१२/२०२०

---

उपविभागीय अधिकारी हवेली
उपविभाग पुणे यांचे कार्यालय
क्र.एनए/एसआर/30/२१
पुणे-१, दि.23/4 /२०२१

**विषय - मौजे रावेत ता.हवेली येथील येथील पेठ क्रं.२९ बल्क लँड प्लॉट नं.१०/२ (१२.५%)क्षेत्र १९७९.४६ चौ.मी.क्षेत्रावर अकृषिक सारा आकारणी करणेबाबत.**

**आदेश**

मौजे **रावेत** ता. हवेली, जि.पुणे येथील खालील वर्णनाची जमीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी यांचे हक्क नोंदणीस दाखल आहे.

| गावाचे नांव | पेठ नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| रावेत | २९ | बल्क लँड नं.१०/२ (१२.५%) | १९७९.४६ चौ.मी. |

या जमिनीस अकृषिक आकारणी करुन मिळणेकामी **मे.सक्सेस इन्फ्रा तर्फे श्री विशाल देविचंद अगरवाल व श्री सुरेश जयंतीलाल पटेल रा. रावेत प्राधिकरण ता हवेली पुणे** यांनी अर्ज दाखल केलेला आहे.अर्ज ठराविक नमुन्यात दिलेला आहे.अर्जा सोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, सदर जमीन पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण निगडी, यांचे नावे असून ती, **मे.सक्सेस इन्फ्रा तर्फे श्री विशाल देविचंद अगरवाल व श्री सुरेश जयंतीलाल पटेल रा. रावेत प्राधिकरण ता हवेली पुणे** यांना भाडेपटयाने दिलेली आहे.

बांधकाम प्रमाणपत्र क्र.बी.पी/वि.प्रा/रावेत/५४/२०२१ दिनांक २२/४/२०२१ अन्वये **रहिवास** वापराचे नकाशे मंजुर केले आहेत.

अर्जदार यांनी भुखंडाचा ताबा घेतलेचे दिनांकापासून आकारणी करणे आवश्यक असलेने त्यानुसार अर्जदार यांनी अकृषिक सारा रु.१०००/-,रूपांतरीत कराची रक्कम रु.५०००/- व थकीत सारा र.रु.१०००/- एकूण रक्कम रु.७०००/- ही अर्जदार यांनी शासकीय कोषागारामध्ये जमा करून चलनाची प्रत या कार्यालयास सादर करावी.

वरील परिस्थिती विचारात घेता,अर्जदार यांनी धारण केलेल्या क्षेत्रास अकृषिक आकारणी करणेस हरकत नाही. म्हणून, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ व त्याखालील नियमानुसार मला प्रदान करणेत आलेल्या शक्तीनुसार मी, उपविभागीय अधिकारी हवेली, उपविभाग पुणे, अर्जदार यांनी

धारण केलेल्या खालील जमीनी मधील क्षेत्रावर रहिवास वापरासाठी अकृषिक आकारणी खालील अटी व शर्तीवर करणेचे आदेश देत आहे.

| गावाचे नांव | पेठ नंबर | प्लॉट नंबर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| रावेत | २९ | बल्क लँड नं.१०/२ (१२.५%) | १९७९.४६ चौ.मी. |

१. पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी मंजूर केलेल्या बांधकाम नकाशानुसार बांधकाम करावे.

२. प्रस्तुतचा आदेश अर्जदार यांनी या कार्यालयाकडे सादर केलेल्या कागदपत्रांनुसार देणेत आलेला असून सदरची कागदपत्रे खोटी अथवा दिशाभूल करणारी आढळल्लेस आदेश रद्द समजणेत येईल.

३. प्रतिवर्षी साऱ्याची रक्कम रु.१०००/- कामगार तलाठी यांचेकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

४. सदरची आकारणी ही तात्पुरत्या कालावधीसाठी करणेत आली असून शासन वेळोवेळी निर्धारीत करील त्याप्रमाणे अंमलात येणारा नवीना प्रमाणदर अंमलात आल्यांांतर जी काही फरकाची रक्कम देय होईल ती शासन जमा करणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

५. सदर आकारणी ही रहिवास कारणासाठी करणेत आली असून सदर क्षेत्राचा वापर रहिवास प्रयोजनासाठीच करणे आवश्यक राहील.प्रयोजनामध्ये बदल करावयाचा झालेस त्यानुसार सुधारित आकारणी करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील. विनापरवानगी प्रयोजनामध्ये बदल केलेस महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार अर्जदार दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहतील.

सही/२२२
(सचिन बारवकर)
उपविभागीय अधिकारी
हवेली उपविभाग पुणे

प्रति ,

मे.सक्सेस इन्फ्रा तर्फे श्री विशाल देविचंद अगरवाल व श्री सुरेश जयंतीलाल पटेल
रा. रावेत प्राधिकरण ता हवेली पुणे

प्रत :- १) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी,पुणे
२) गाव कामगार तलाठी रावेत यांचेकडे नियमानुसार पुढील योग्य त्या कार्यवाहीकामी.
३) मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे

उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग SUB DIVISIONAL OFFICER HAVELI SUB DN. PUNE पुणे

23/4/2021
उपविभागीय अधिकारी
हवेली उपविभाग पुणे